# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषद
## कार्यवृत्तांत
### गुरुवार, दि. १० सप्टेंबर,२००९ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची सभा गुरुवार दि.१०/०९/२००९ रोजी दुपारी ०१:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बी. पी. बंडगर - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | मा. प्रा. डॉ. ए. एन. बारबोले | सदस्य |
| ३) | मा. डॉ. एल. पी. देशमुख | सदस्य |
| ४) | मा. प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे -संचालक म. व वि. वि. मं. | सदस्य |
| ५) | मा. प्राचार्य श्री. जे. के. बिले | सदस्य |
| ६) | मा. प्राचार्य डॉ. सी. बी. कोळेकर | सदस्य |
| ७) | मा. डॉ. पी. जी. मोरे | सदस्या |
| ८) | मा. श्री एन. बी. पवार | सदस्य |
| ९) | मा. श्रीमती एन. व्ही. साठे | सदस्य |
| १०) | मा. डॉ. एच. एन. जगताप | सदस्य |
| ११) | मा. श्री. बी. पी. रोंगे | सदस्य |
| १२) | मा. श्री. एन. आर. गरड | सदस्य |
| १३) | मा. श्रीमती एम. एस. कदम | सदस्या |
| १४) | मा. डॉ. डी. जे. साळुंखे -परीक्षा नियंत्रक | स्थायी निमंत्रित |
| १५) | मा. डॉ. डी. डी. पुजारी -वित्त व लेखा अधिकारी | स्थायी निमंत्रित |
| १६) | मा. प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे - प्र. कुलसचिव | सचिव |

**स्वागतः**

सर्वप्रथम स्थायी समितीच्या दि. १६/०६/२००९ रोजीच्या सभेतून व्यवस्थापन परिषदेवर नामनिर्देशित झालेल्या नवनियूक्त **प्रा. ए. एन. बारबोले, डॉ. एच. एन. जगताप** व **प्रा. एन. आर. गरड** यांचे स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

मा.डॉ. बी. बी. कदम शिक्षण सहसंचालक कोल्हापूर विभाग यांनी दूरध्वनीद्वारे आणि श्री. जयसिंह मोहिते-पाटील व श्री. पी. एम. हिरेमठ यांनी पत्राद्वारे व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याचे कळविले आहे याची अध्यक्षांनी नोंद घेतली.

**सदर सभेस खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**विषय क्र.१** **दि. १२ जून, २००९ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

**ठराव क्र.१** **व्यवस्थापन परषिद दि.१२ जून, २००९ रोजी झालेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरूस्त्यांसह वाचून कायम करण्यात आला**

| ठराव क्रं. | दुरूस्ती |
|---|---|
| ७ | ==== ऐवजी .... अशी दुरूस्ती |
| ९ | डॉ. आर. बी. पिरगोंडे यांचे प्रकरण पुनश्च : तक्रार निवारण समितीकडे पाठवावे. |
| ११ | दुरूस्ती क्रं. २ 20% Objectives, 40% short and 40 % long<br>दुरूस्ती क्रं. ३ Prliminary exam 10 marks वगळावे<br>दुरूस्ती क्रं. ४ Qualifications for teachers and Lab-Instructor B.E. Electronics व M.Sc. Electronics अंतर्भूत करावे<br>दुरूस्ती क्रं. ६ यापूर्वीचे पी.जी. डी.सी.ए. चे शूल्क आकारण्यात यावे |
| २० | Quotations ऐवजी Quotes अशी दुरूस्ती |
| २३ | प्रस्तुत विषय पुढील बैठकीत पुनश्चः विचारार्थ ठेवावा. |
| २५ | दुरूस्ती क्रं. ३ पान नं.२७४ वर प्रा. एल. पी. देशमुख, विभागप्रमुख ऐवजी एस.एस. सुर्यवंशी, विभागप्रमुख अशी दुरूस्ती |

**विषय क्र.२ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

**(सोबत अहवाल जोडला आहे)**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

| | |
|---|---|
| **ठराव क्र.२** | **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) अन्वये मा. कुलगुरू महोदयांनी सादर केलेल्या विद्यापीठाच्या कामकाजाच्या अहवालाची खालील दुरूस्तीसह नोंद घेण्यात आली.<br>१. विशेष कक्ष ( B.C. Cell ) विभाग ऐवजी विशेष कक्ष (Special Cell) विभाग असे नमुद करावे.<br>२. माजी कुलसचिव पी.बी. कुंभार यांचेसंदर्भात विषय पुढील बैठकीत ठेवावा.<br>३. प्र. प्राचार्य निवडी संदर्भात विषय पुढील बैठकीत ठेवावा.** |

**विषय क्र. ०३ मा. संगम आर. एन. (रा. सोलापूर) यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह सोलापूर विद्यापीठ ग्रंथालयास देणगी दाखल स्विकारणेबाबत.**

(टिपणीः- मा. संगम आर. एन. यांच्या सोबतच्या पत्रान्वये त्यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह विद्यापीठ ग्रंथालयास देणगी म्हणून देण्याची त्यांची इच्छा आहे. ग्रंथालयास देणगी दाखल मिळणाऱ्या ग्रंथाची उपयुक्तता तसेच त्यांची वापराबाबतची स्थिती इ. बाबत ग्रंथालय उप समितीने पाहणी करुन ग्रंथ स्विकारणेबाबत शिफारस करावयाची असते. परंतु सदरचे ग्रंथ हे (Statitics) संख्याशास्त्र या एकाच विषयांचे असल्याने अधिविभागाकडील संख्याशास्त्र या विषयामध्ये अधिव्याख्याता मा.डॉ. व्ही. बी. घुटे यांचे "विषय तज्ञ" म्हणून मत घेण्यात आले असून त्यांनी सदरचे ग्रंथ स्विकारावेत असा शेरा दिला आहे तो यासोबत जोडला असून कृपया तो अवलोकनी घ्यावा, तरी सदरचा ग्रंथसंग्रह विद्यापीठाकडील "संख्याशास्त्र" या अधिविभागास उपयुक्त होईल. तो विद्यापीठाने स्वीकारावा अशी इच्छा आहे.

सदरचा ग्रंथसंग्रह स्विकारणेबाबत महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (h) प्रमाणे स्विकारणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.३** | **मा. संगम आर. एन. (रा. सोलापूर) यांचा व्यक्तीगत ग्रंथसंग्रह देणगी दाखल स्विकारण्यात आला.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. ४** | **तुळजाभवानी महिला मंडळ, शेळगाव (आर) या संस्थेच्या हेमुजी चंदेले बी.सी.एस. कॉलेज, शेळगाव (आर) या महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(टिपणी:- तुळजाभवानी महिला मंडळ, शेळगाव (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर संचलित हेमुजी चंदेले बी.सी.एस. कॉलेज, शेळगाव (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर या महाविद्यालयाचे नाव **"हेमुजी चंदेले कॉलेज, शेळगाव (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर"** असा बदल करण्यास मान्यता देण्याबाबतचे विहीत नमुन्यातील फॉर्म भरुन दिले असून संस्थेने नावात बदल करण्याचे शुल्क रु.१५,०००/- भरलेले आहे (पावती क्रमांक ४५८७ दि.२५-०६-२००९) तसेच आवश्यक सर्व कागदपत्रे सादर केले आहेत.

महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्यावतीने या प्रस्तावास मा.कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४ (७) अन्वये मान्यता दिलेली आहे.

पूर्वीचे नांव :- तुळजाभवानी महिला मंडळ, शेळगाव (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर संचलित हेमुजी चंदेले बी.सी.एस. कॉलेज, शेळगाव (आर) ता. बार्शी, जि. सोलापूर

नावातील बदल :- **तुळजाभवानी महिला मंडळ, शेळगाव (आर), ता.बार्शी, जि. सोलापूर संचलित हेमुजी चंदेले कॉलेज, शेळगाव (आर) ता.बार्शी, जि. सोलापूर**

महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव क्र.४** | **तुळजाभवानी महिला मंडळ, शेळगाव (आर) या संस्थेच्या हेमुजी चंदेले बी.सी.एस. कॉलेज, शेळगाव (आर) या महाविद्यालयाच्या नावातील बदलाचा प्रस्ताव खालीलप्रमाणे<br>तुळजाभवानी महिला मंडळ, शेळगाव (आर), ता.बार्शी, जि. सोलापूर संचलित हेमुजी चंदेले कॉलेज, शेळगाव (आर) ता.बार्शी, जि. सोलापूर<br>असा नावातील बदल स्विकारण्यात आला.** |

**विषय क्र. ५ विद्यापीठातील खाजगी कंत्राटदारामार्फत कार्यरत असलेल्या संगणक लेखनिक यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी : विद्यापीठातील वित्त व लेखाविभागात संगणक लेखनिक म्हणून रुपये ४५००/- एकत्रित वेतनावर खाजगी कंत्राटदारामार्फत कार्यरत आहे. खाजगी कंत्राटदार मे. वर्षा विजग्राहक स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित सोलापूर यांच्या बरोबर मनुष्यबळ पुरविण्याबाबत करार करण्यात आलेला आहे. या करारनाम्यात कलम २५ चा अंतर्भाव करण्याकरीता प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या ३० मार्च २००९ रोजीच्या सभेत विषय क्र. ०५ अन्वये ठेवण्यात आला होता त्यावरील ठरावानुसार सहा प्रशासकीय सेवकांचे एकत्रित वेतन ठरविण्यात आले होते.

दि.२३/०६/२००९ च्या टिपणीनूसार मा.कुलगुरुंनी वित्त व लेखा विभागातील कंत्राटी संगणक लेखनिकांचे माहे वेतन रुपये ४५००/- ऐवजी रुपये ६०००/- करण्यास मान्यता दिली आहे.

सदरबाब कंत्राटी संगणक लेखनिक यांच्या वेतनवाढीबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ५** | **उक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र. ६ शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता विद्यापीठातील विविध संकुलासाठी अधिव्याख्यातांची व प्रपाठकांची तात्पूरती पदे निर्माण करुन Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण झाली आहे ही बाब माहितीस्तव.**

सोबत : निवड झालेल्या उमेदवारांची यादी व त्यांचे वेतन

(टिपणी : प्रस्तुत विद्यापीठातील संकुलासाठी सोबत जोडल्याप्रमाणे अधिव्याख्यातांची व प्रपाठकांची शैक्षणिक वर्ष २००९-२०१० साठी आवश्यकता असल्याने महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७७ मधील तरतूदी प्रमाणे तात्पूरत्या स्वरुपात पदे निर्माण करुन Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे.

सदर जाहिरातीच्या अनुषंगाने स्थानिक निवड समितीची बैठक दि.१५-०६-२००९ व १६-०६-२००९ रोजी आयोजित करुन Walk-in-Interview द्वारे उमेदवारांच्या मुलाखती घेण्यात आलेल्या असून स्थानिक निवड समितीच्या शिफारशीनुसार व महाराष्ट्र शासनाचे शासन निर्णय क्र. टीईडी-२००८/(१८३)/०८/तांशि-५, दिनांक ०५ नोव्हेंबर, २००८ अन्वये अभ्यांगत अध्यापकांना प्रदान करावयाच्या सुधारित दरानुसार मंजूर पदाच्या अधिनराहून अभ्यांगत प्राध्यापक व एकत्रित वेतनावर निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश निर्गमित करुन सेवेत रुजू करुन घेण्यात आले आहेत.

महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ कलम ७७ मधील तरतूदी प्रमाणे तात्पूरत्या स्वरुपात पदे निर्माण करुन Walk-in-Interview द्वारे भरती प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. ही माहितीस्तव.)

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ६** | **Walk in Interview द्वारे भरतीप्रक्रियेची महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, १९९४ कलम ७७ अन्वये केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

| | |
|---|---|
| **विषय क्र. ७** | **श्री. बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर संचलित, एस. व्ही. सी. एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्याक दर्जा मिळाल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.** |

(प्रस्तावासोबत प्राप्त झालेली ०३ पाने जोडली आहेत)

(टिपणी : महाराष्ट्र शासनाचे पत्र क्र. अशैसं-२००७/२२०/प्र.क्र.१८८/ २००७/३५/का.१, दि.०७ जुलै, २००८ नुसार श्री. बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर या संस्थेस अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र दिलेले आहे. अल्पसंख्याक दर्जा हा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधिग्राह्य असल्याचे नमूद केलेले आहे.

यापूर्वी अशा प्रकारच्या तीन संस्थांचे प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर ठेवलेले होते त्यावर कार्यवाही चालू आहे. नजीकच्या काळात विद्यापरिषदेची बैठक होणार नसल्याने मा.कुलगुरु यांनी सदरचा विषय विद्यापरिषदेच्या वतीने मान्य करुन व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीसमोर ठेवण्यास मान्यता दिलेली आहे.

श्री. बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर संचलित, एस. व्ही. सी. एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्याक दर्जाच्या मान्यतेचे प्रमाणपत्र दिलेले आहे. व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ७** | **श्री. बृहन्मठ होटगी संस्था, सोलापूर संचलित, एस. व्ही. सी. एस. शिक्षणशास्त्र महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयास महाराष्ट्र शासनाकडून अल्पसंख्याक दर्जा शैक्षणिक वर्ष २००८-०९ पासून विधीग्राहय असल्याची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र. ८ सोलापूर विद्यापीठाचे निरंतर संलग्निकरणासाठी व नवीन महाविद्यालयांसाठी करावयाच्या अर्जाच्या शुल्कात फॉर्म अद्यावत करण्यासाठी नियुक्त केलेल्या समितीने शुल्कात व नवीन महाविद्यालय सुरु करतेवेळी बँकेत ठेवावयाच्या मुदत ठेवीच्या रक्कमेत केलेली वाढ व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी :सोलापूर विद्यापीठाकडे निरंतर संलग्निकरणासाठी व स्थानिक चौकशी समितीसाठी उपलब्ध असलेले विविध फॉर्म अद्यावत करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती नियुक्त केली होती.

१) प्रा. डॉ. पी. जी. मोरे
२) प्राचार्य डॉ. एच. एन. जगताप
३) प्राचार्य डॉ. एस. ए. हलकुडे
४) प्राचार्य डॉ. एस. बी. सागरे
५) प्राचार्य श्री. के. एम. जमादार

वरील समिती सदस्याने फॉर्म्स अद्यावत केलेले आहेत. अद्यावत केलेले सर्व फॉर्म्सना दि.१७/०४/२००९ रोजीच्या बैठकीत विद्यापरिषदेने मान्यता दिलेली आहे. वरील समितीने सदरचे फॉर्म अद्यावत करताना खालील फॉर्मच्या शुल्कात पुढीलप्रमाणे वाढ केली आहे.

| **अनु.क्र.** | **फॉर्मचा तपशील** | **फॉर्मचे जुने शुल्क** | **फॉर्मचे नवीन शुल्क** |
|---|---|---|---|
| १) | नवीन संलग्निकरण | रु.५००/- | रु.१०००/- |
| २) | निरंतर संलग्निकरण | रु.५००/- | रु.१०००/- |

**तसेच या समितीने नवीन महाविद्यालय सुरु करतेवेळी बँकेत ठेवावयाच्या मुदत ठेवीची रक्कम पूर्वीच्या रु.१ लाख ५० हजारावरुन रु.५ लाख केलेली आहे.**

शै. वर्ष २०१०-११ साठी निरंतर संलग्निकरण व नवीन महाविद्यालयाच्या संलग्निकरणासाठी बदललेल्या शुल्कासह अर्ज वित्त व लेखा विभागाकडे विक्रीसाठी उपलब्ध करुन महाविद्यालयांना उपलब्ध करुन द्यावे लागणार आहेत व शै. वर्ष २०१०-११ साठी नवीन महाविद्यालयांचे प्रस्ताव स्वीकारताना संस्थेच्या नावावर रु.५ लाखाची ठेव ठेवावी लागणार आहे.

सबब, वरील प्रमाणे अर्जाचे शुल्क व नवीन महाविद्यालयाच्या बँकेत ठेवावयाच्या मुदत ठेवीच्या शुल्कात वरील समिती सदस्यांकडून केलेली वाढ व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ८** | **अ) अनुक्रमांक १ व २ अन्वये नवीन/निरंतर संलग्नीकरणाचे फॉर्म शूल्क १००० रुपये आकारण्यास मान्यता देण्यात आली.**<br>**ब) शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून नवीन महाविद्यालयांचे प्रस्तवा स्विकारतांना संस्थेच्या नावावर रू.५,००,०००/- ( रूपये पाच लाख फक्त ) ठेव ठेवण्याबाबत महाराष्ट्रातील इतर विद्यापीठातून माहिती मागवून सर्वकष विषय पुढील व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करावा असे ठरले.** |

**विषय क्र.९ शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर..**

(प्रस्तावासोबत प्राप्त झालेली ०४ पाने जोडली आहेत).

(टिपणी : विद्यापीठ अनुदान आयोग, न्यू दिल्ली यांच्याकडून आलेले पत्र क्र. No. F.-1/1/2002(PS) Exemp, दि.१५-६-२००९ शिक्षकांच्या शैक्षणिक अर्हतेबाबत आहे. याची तातडीने अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याने व विद्यापरिषदेची बैठक नजीकच्या कालावधीत होणार नसल्याने मा.कुलगुरु यांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिली.

विद्यापीठाने परिपत्रक क्र. SOL/BCUD/DH/2192, Dt.09-07-2009 नुसार सर्व संलग्नित महाविद्यालयांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी कळविलेले आहे.

मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. ९** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१०	विद्यापीठामध्ये मनुष्यबळ पुरविणाऱ्या खाजगी कंत्राटदाराकडून मनुष्यबळ वाढविणाच्या प्रस्तावावर मा.कुलगुरुमहोदयांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणीः विद्यापीठाकडील विविध संकूलातील मागणी केल्याप्रमाणे रिक्त पदावर मनुष्यबळ पुरविणाऱ्या खाजगी कंत्राटदाराकडून मनुष्यबळ वाढविण्याबाबत धोरणात्मक निर्णय होण्यासाठी प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या दि.१७/०७/२००९ रोजीच्या सभेत आयत्या वेळेचा विषय म्हणून खालील प्रस्ताव सादर करण्याकरिता मान्य करुन घेण्यात आलेला होता.

| अ. क्र. | संकूलाचे नांव | मागणी केलेल्या मनुष्यबळाचा तपशील | एकूण संख्या |
|---|---|---|---|
| १) | रसायनशास्त्र संकूल | ०२ कायम,<br>०१ कंत्राटी प्रयोगशाळा सहाय्यक | ०३ |
| २) | संगणकशास्त्र संकूल | लिपिक ०१ | ०१ + ०१ |
| ३) | राष्ट्रीय सेवा योजना विभाग | लिपिक ०१ | ०१ |
| ४) | पदार्थविज्ञान संकूल | भांडारपाल ०१,<br>प्रयोगशाळा सहाय्यक ०१ | ०२ |
| ५) | वित्त व लेखा विभाग | लिपिक ०३<br>शिपाई ०१ | ०४ |
| ६) | बी.सी.यु.डी. | लिपिक | ०१ |

परंतू, काही अपरिहार्य कारणास्तव दि.१७/०७/२००९ रोजी होणारी व्यवस्थापन परिषदेची सभा पुढे ढकलण्यात आली आहे. नुकतीच २००९-१० या शैक्षणिक वर्षास सुरुवात झालेली असल्यामुळे संकूलाकडील प्रवेश प्रक्रिया व इतर कामकाजासाठी मनुष्यबळाची आवश्यकता आहे. तातडीची बाब लक्षात घेता, मा.कुलगुरुमहोदयांनी महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम १४(७) अन्वये या प्रस्तावास मान्यता दिलेली आहे.

मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १०** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.११ महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ९९ (५) नुसार व जनरल स्टॅट्यूटप्रमाणे अपेंडिक्स IV (Appendix IV) या अर्जाची किंमत व नोंदणी फी ठरविण्याबाबत मा.कुलगुरु यांनी केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(सोबत पदवीधर नोंदणी अर्ज)

(टिपणी :- शासन अधिसूचना क्र. युएसजी१००४/(९४/२००४)/विशि-१, दिनांक २२ जुलै २००४ नुसार, सोलापूर विद्यापीठाची स्थापना झालेली असून प्रत्यक्ष कामकाजास दि. ०१ ऑगस्ट २००४ पासून सुरुवात झालेली आहे.

विद्यापीठाच्या स्थापनेनंतर उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२ यांचे पत्र क्र. युएसजी१००४/(१९६/२००४)/विशि-१, दि.०२ नोव्हेंबर, २००५ व महाराष्ट्र शासन राजपत्र, नोव्हेंबर २४, २००५/अग्रहायण ३, शके १९२७ अन्वये सोलापूर विद्यापीठासाठी **व्यवस्थापन परिषद** व **विद्यापरिषद** शासनाने **०५ वर्षाकरीता** गठीत केलेली आहे.

सदर प्राधिकरणाची मुदत **०२ नोव्हेंबर, २००५ ते २४ नोव्हेंबर २०१०** अशा **०५ वर्षाकरीता** आहे.

या मुदतीनंतर म. वि. का. १९९४ मधील कलम ४७ नुसार, निवडणुका घेऊन प्राधिकरणावरील सदस्याची निवड करणे गरजेचे आहे. तसेच **अधिसभा (SENATE)** या अधिकार मंडळाचे गठन करावे लागणार आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम २५ (२) (द) नुसार (MUA १९९४ Section २५ (२) (r) नुसार निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांकरीता महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील कलम ९९ (५) नुसार व जनरल स्टॅट्यूटप्रमाणे **अपेंडिक्स IV (Appendix IV)** या **अर्जाची किंमत रु.०५/-** व **नोंदणी फी रु.५०/-** ठरविण्याबाबत मा.कुलगुरु यांनी महाराष्ट्र विद्यापीठे कायदा १९९४ मधील कलम १४ (७) नुसार कार्यवाही केलेली आहे.

सदरची कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| **ठराव क्र. ११** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |
|---|---|

**विषय क्र.१२ दिनांक २७ डिसेंबर, २००७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठराव क्र. १४ अन्वये विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीस पूर्वलक्षी प्रभावाने दिलेल्या मान्यतेचा प्रस्ताव मा.सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग, कोल्हापूर या कार्यालयास पूर्नविचारार्थ ठेवल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(सोबत दिनांक १२-०६-२००९ रोजीच्या व्य.प. बैठकीतील विषय व ठराव.)

**(**टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना पदोन्नती दिलेल्या पदांना मा.सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग, कोल्हापूर **व** मा. लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांची मंजूरी घेण्यात आलेली आहे. परंतू पूर्वलक्षी प्रभावाने मंजूरी दिलेल्या पदांच्या तारखेत सोबत जोडल्याप्रमाणे दुरुस्ती करुन मंजूरी दिलेली आहे. सदरची बाब माहितीस्तव दिनांक १२-०६-२००९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठेवण्यात आली होती. यावरील ठरावानुसार, **प्रस्तावात दुरुस्ती न करता प्रस्ताव पुर्नविचारार्थ मा.सहसंचालक उ.शि. कोल्हापूर / लेखाधिकारी उ.शि.कोल्हापूर यांचे कडे पाठवावा असे ठरले,** या अनुषंगाने दिनांक २०-०६-२००९ रोजी मा.सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी प्रस्तुत विद्यापीठात भेट दिली, त्यावेळी उक्त प्रस्तावातील कर्मचाऱ्यांनी, मा.प्र.कुलसचिव व सहसंचालक, उच्च शिक्षण यांच्या समवेत चर्चा केल्यानंतर प्रस्तावातील कर्मचाऱ्यांना मा. सहसंचालक, उच्च शिक्षण व लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान यांनी दुरुस्ती करुन मान्यता प्रदान केलेल्या तारखेलाच पदोन्नती देय राहील असे, चर्चे अंति ठरले व सदरील कर्मचाऱ्यांचे शंका निरसन करण्यात आले आहे.

| अ.क्र. | कर्मचाऱ्यांचे नांव | पदोन्नती देण्यापूर्वीचे पद | पदोन्नती दिल्यानंतरचे पद | पदोन्नतीची तारीख | **मा. सहसंचालक, उच्च शिक्षण कोल्हापूर विभाग व लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, कोल्हापूर यांनी मान्यता प्रदान केलेले पदनाम व तारीख** | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | **पदनाम** | **तारीख** |
| **०१** | **०२** | **०३** | **०४** | **०५** | **०६** | **०७** |
| ०१ | श्री. कांबळे डी. एस. | सहा. अधीक्षक | अधीक्षक | २८-०७-२००६ | **अधीक्षक** | **२८-०६-२००७** |
| ०२ | श्री. काळे एस. टी. | वरिष्ठ लिपिक | सहा. अधीक्षक | २८-०७-२००६ | **सहा. अधीक्षक** | **२८-०६-२००७** |
| ०३ | श्री. वलेकर डी. एम. | वरिष्ठ लिपिक | सहा. अधीक्षक | ०४-१०-२००७ | **सहा. अधीक्षक** | **१४-०१-२००८** |
| ०४ | श्री. पाटील ए. एस. | वरिष्ठ लिपिक | सहा. अधीक्षक | ०४-१०-२००७ | **सहा. अधीक्षक** | **१४-०१-२००८** |
| ०५ | श्री. कदम एल. एस. | कनिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | २८-०७-२००६ | **वरिष्ठ लिपिक** | **२८-०६-२००७** |
| ०६ | श्री. दीक्षित पी. एस. | कनिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | ०४-१०-२००७ | **वरिष्ठ लिपिक** | **१४-०१-२००८** |
| ०७ | श्री. पाटील एम. ए. | कनिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | ०४-१०-२००७ | **वरिष्ठ लिपिक** | **१४-०१-२००८** |
| ०८ | श्री. दळवे एल. बी. | कनिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | ०४-१०-२००७ | **वरिष्ठ लिपिक** | **१४-०१-२००८** |
| ०९ | श्री. पवार व्ही. डी. | कनिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | ०४-१०-२००७ | **वरिष्ठ लिपिक** | **१४-०१-२००८** |
| १० | श्री.क्षीरसागर एस.एम. | कनिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | ०४-१०-२००७ | **वरिष्ठ लिपिक** | **१४-०१-२००८** |
| ११ | श्री. चौधरी एस. बी. | कनिष्ठ लिपिक | वरिष्ठ लिपिक | ०४-१०-२००७ | **वरिष्ठ लिपिक** | **१४-०१-२००८** |
| १२ | श्री.सावळगी जे.आर | शिपाई | हवालदार | ०४-१०-२००७ | **हवालदार** | **१४-०१-२००८** |
| १३ | श्रीमती राख जे. एस. | शिपाई | प्रयोगशाळा परिचर | ०४-१०-२००७ | **प्रयोगशाळा परिचर** | **१४-०१-२००८** |

सबब उपरोक्त प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.)

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १२** | **उक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली. मा.सहसंचालक उ.शि. कोल्हापूर / लेखाधिकारी उ.शि.कोल्हापूर यांनी निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही व्हावी.** |

**विषय क्र.१३ महाराष्ट्र शासन शासन निर्णय दिनांक २१ जुलै, २००९ अन्वये, असुधारित वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी, २००९ पासून महागाई भत्ता ५४ टक्क्यावरुन ६४ टक्के केल्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(सोबत शासन निर्णय)

(टिपणी: महाराष्ट्र शासन, वित्त विभागाचे शासन निर्णय क्र. मभवा-११०९/प्र.क्र.९६/सेवा-९, दिनांक २१ जुलै, २००९ नूसार, असुधारित वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी, २००९ पासून महागाई भत्ता ५४ टक्क्यावरुन ६४ टक्के केलेला आहे.

उक्त शासन निणर्यात पुढील प्रमाणे नमूद केले आहे **"जे राज्य शासकीय व इतर सर्व पात्र पूर्णकालिक कर्मचारी असुधारित वेतनश्रेणीत वेतन घेत आहेत, त्यांचा असुधारित वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्याचा दर दिनांक ०१ जानेवारी पासून ५४ टक्के वरुन ६४ टक्के करण्यात यावा"**.

प्रस्तुत विद्यापीठातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना वरील शासन निर्णयाप्रमाणे महागाई भत्ता ०१ जानेवारी, २००९ पासून **५४** टक्क्यावरुन **६४** टक्क्याप्रमाणे आदा करण्याबाबत लेखा विभागास कळविण्यात आले आहे.

तथापि, ही बाब व सदरचा शासन निर्णय व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १३** | **महाराष्ट्र शासन शासन निर्णय दिनांक २१ जुलै, २००९ अन्वये, असुधारित वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक ०१ जानेवारी, २००९ पासून महागाई भत्ता ५४ टक्क्यावरुन ६४ टक्के केल्याच्या बाबीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१४ परीक्षा विभागासाठी अत्यावश्यक मनुष्यबळ तात्पुरत्या स्वरुपात (पाच महिने) वर्षा विजग्राहक या खाजगी संस्थेकडून घेतल्याची बाब माहितीस्तव.**

(टिपणी : १) दिनांक ०२/०३/२००९, २) दि.१६/०४/२००९ नुसार परीक्षा विभागाकरीता, माहे मार्च २००९ च्या अंदाजे ५५ हजार विद्यार्थीच्या परीक्षेचे फॉर्म फिडींग, परीक्षेचे कोडींग, मार्क फिडींग इ. डेटा एंट्रीचे काम तातडीने करण्याकरीता १४ कंत्राटी संगणक लेखनिक व ०२ शिपाई एकूण १६ कर्मचारी खाजगी कंत्राटदार मे. वर्षा विजग्राहक स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादित सोलापूर यांच्याकडून निकाल प्रक्रियेचे कामे करण्यासाठी विशिष्ट कालावधीकरिता तात्पुरत्या स्वरुपात पुरविण्यात आले होते.

सदर मनुष्यबळ पुरविण्याकरीता दि.०२/०३/२००९ रोजीच्या आस्थापना विभागाच्या टिपणीस व दि.१६/०४/२००९ रोजी परीक्षा विभागाच्या टिपणी मा.कुलगुरुंनी परीक्षा विभागाच्या कामाचे गांभीर्य लक्षात घेऊन मान्यता दिली होती.

सबब, परीक्षा विभागासाठी अत्यावश्यक मनुष्यबळ तात्पुरत्या स्वरुपात (पाच महिने) वर्षा विजग्राहक या खाजगी संस्थेकडून घेतल्याची बाब माहितीस्तव).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १४** | **उक्त प्रस्तावाची नोंद घेण्यात आली.** |

**विषय क्र.१५ शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर यांच्याकडे पदवीधर नोंदणी केलेल्या नोंदणीकृत पदवीधरांची नोंदणी प्रस्तुत विद्यापीठाकडे समाविष्ट करुन घेण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:- ज्या पदवीधरांनी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे पदवीधर नोंदणी केलेली आहे. त्यांची पदवीधर नोंदणी सोलापूर विद्यापीठाकडे समाविष्ट करुन घ्यावी अशी काही संघटनांनी मागणी केलेली आहे.

याबाबत कार्यालयाचे निवेदन असे की,

**१)** दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेतील **(दोन), (तीन) व (चार)** खालीलप्रमाणे आहे.

***(दोन)*** *शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे सोलापूर जिल्ह्यातील आपल्या नोंदणीकृत पदवीधारकांची, शिवाजी विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर म्हणून कायम राहण्याची किंवा सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडे नोंदणी करुन घेण्याची इच्छा आहे किंवा कसे याबाबतचा विकल्प त्यांच्याकडून मागवून घेईल;*

***(तीन)*** *नोंदणीकृत पदवीधर, त्यांच्या विकल्पासंबंधीची कागदपत्रे, कुलसचिव शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे दिनांक ३१ डिसेंबर, २००४ रोजी किंवा त्यापूर्वी सादर करतील. शिवाजी विद्यापीठ, विकल्पविषयक कागदपत्रांची विल्हेवाटी करील आणि सोलापूर विद्यापीठाकडे नोंदणी करण्याचा विकल्प देणाऱ्या नोंदणीकृत पदवीधरांची विकल्पविषयक कागदपत्रे सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांच्याकडे पाठवील;*

***(चार)*** *विर्निदिष्ट कालावधीत जे नोंदणीकृत पदवीधर त्यांचा विकल्प देणार नाहीत ते, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचे नोंदणीकृत पदवीधर राहतील.*

**२)** महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ मधील **कलम ९९ (१) (ख)** नुसार, *[ज्यामधून नवीन तत्सम विद्यापीठाची स्थापना करण्यात आली आहे त्या मूळ विद्यापीठाच्या पदवीधर असलेल्या व्यक्ती :*

*परंतू, मूळ विद्यापीठामध्ये नोंदणीकृत पदवीधर म्हणून ज्यांची नोंदणी झाली आहे परंतु, जे नवीन विद्यापीठाच्या अधिकारितेत राहात आहेत अशा पदवीधरांना नवीन विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी करण्याकरिता, नवीन विद्यापीठाकडे अर्ज करावा लागेल आणि नवीन विद्यापीठामध्ये एकदा नोंदणी झाल्यावर ते आपोआप मूळ विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर म्हणून असण्याचे बंद होईल.]* या कलमानुसार, मूळ विद्यापीठामध्ये पदवीधर नोंदणी केलेल्या पदवीधरांना जे नवीन विद्यापीठाच्या अधिकारितेत राहात आहेत अशा पदवीधरांना नवीन विद्यापीठाकडे अर्ज करावा लागेल.

उपरोक्त क्र. १) (दोन) नुसार शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी सोलापूर जिल्ह्यातील नोंदणीकृत पदवीधारकांकडून विकल्प मागविलेले होते. यापैकी, २३ पदवीधारकांनी विकल्प दिलेले होते. क्र. २) (तीन) सदर २३ पदवीधारकांची पदवीधर नोंदणी कागदपत्रे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांनी सोलापूर विद्यापीठाकडे वर्ग केलेली आहे. (चार) नुसार, ज्या नोंदणीकृत पदवीधरांनी विकल्प दिलेल नाही ते शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचेच पदवीधर आहेत.

सबब, उपरोक्त दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेतील **(दोन), (तीन) व (चार)** व म.वि.का. १९९४ मधील **कलम ९९ (१) (ख)** अवलोकनी घेता, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्याकडे पदवीधर नोंदणी केलेल्या नोंदणीकृत पदवीधरांची पदवीधर नोंदणी सोलापूर विद्यापीठाकडे समाविष्ट करुन घेण्याच्या धोरणात्मक निर्णयासाठी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| ठराव क्र. १५ | **महाराष्ट्र शासनाच्या दि.२२ जुलै, २००४ रोजीच्या अधिसूचनेअन्वये कार्यवाही करावी असे ठरले.** |
|---|---|

| | |
|---|---|
| **विषय क्र.१६** | **शै.वर्ष २०१०-११ चा सोलापूर विद्यापीठाचा सुधारीत बृहत आराखडा तयार करण्यासाठी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारसी व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.** |

(सोबत आवश्यक ती कागदपत्रे जोडलेली आहेत)

(टिपणी - महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ३६(२) अन्वये बृहत आराखडा महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ समितीने तयार करण्याची कायद्यात तरतूद आहे. महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ८२ (१) नुसार बृहत आराखडा आवश्यक असल्यास अद्यावत करण्यात येतो. मा.कुलगुरुंनी शै.वर्ष २०१०-११ साठी सुधारीत बृहत आराखडा तयार करण्यासाठी समिती गठीत केली होती.या समितीची दि.११.०६.२००९ रोजी बैठक झालेली असून समितीने शै.वर्ष २०१०-११ च्या सुधारीत बृहत आराखडयाच्या अनुषंगाने शिफारसी केल्या होत्या. या शिफारसी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या दि.०४.०८.२००९ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आल्या होत्या. (सोबत कार्यवृत्तांत जोडला आहे)

सबब शै.वर्ष २०१०-११ साठी सुधारीत बृहत आराखडाबाबतच्या महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाच्या शिफारसी व सदरच्या बृहत आराखडयात तालुक्यानुसार समाविष्ट करण्यात येणा-या अभ्यासक्रमाची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १६** | **शै.वर्ष २०१०-११ चा सोलापूर विद्यापीठाचा सुधारीत बृहत आराखडा तयार करण्यासाठी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाची शिफारस खालील दुरुस्त्यांसह स्वीकारण्यात आली.**<br>**१) अ.क्र.१२ अन्वये पंढरपूर करीता अभियांत्रिकी महाविद्यालय वगळावे त्याऐवजी आर्टस, कॉमर्स, सायन्स महाविद्यालयाचा अंतर्भाव करावा**<br>**२) अ.क्र. ०६ मध्ये माढ्यासाठी अभियांत्रिकी महाविद्यालयाचा अंतर्भाव करावा.** |

**विषय क्र.१७ दि.०२/०९/२००९ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी सादर.**

(सोबत कार्यवृत्तांत जोडला आहेत)

(टिपणी - दि.०२/०९/२००९ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. तो वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता त्यास दि.०२/०९/२००९ च्या वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केली आहे.

सबब, दि.०२/०९/२००९ रोजीच्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १७** | **दि.०२/०९/२००९ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांताची वित्त व लेखा समितीने व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस स्वीकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**<u>आयत्या वेळेचे विषय :-</u>**

**विषय १८ (१) मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी पुणे यांच्यासमवेत Collaborative Research Work करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी पुणे यांचे पत्र जोडले आहे).

(टिपणी:- मॉडेल कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे हे महाविद्यालय पुणे विद्यापीठाशी संलग्नित असून ए. आय. सी. टी. ई. नवी दिल्ली व पी. सी . आय. नवी दिल्ली यांची मान्यता आहे. सदर महाविद्यालयाने वेगवेगळे कंपाऊंडस् टेस्ट करण्याच्या सेवा पुरवू शकतात असे कळविले आहे. सोलापूर विद्यापीठाबरोबर रसायनशास्त्र विभागाशी संबंधित Collaborative Research Work करण्याबाबत उत्सुकता दर्शविली असून याकामी त्यांनी डॉ. एस. जी. येरंडे असिस्टंट प्रोफेसर यांची Key Contact Person म्हणून नियुक्ती केली आहे.

सबब, मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी, पुणे यांच्यासमवेत Collaborative Research Work करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(१)** | **मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी पुणे यांच्यासमवेत Collaborative Research Work करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय १८ (२) पदार्थविज्ञान विभागाकडील लाकडी फर्निचर निर्लेखन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(सोबत निर्लेखन समितीचा अहवाल जोडलेला आहे).

(टिपणी:- पदार्थविज्ञान विभागाकडील लाकडी फर्निचर निर्लेखन करण्याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला होता. त्यानुसार, प्रा. आर. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीने विभागास वेळोवेळी भेट देवून फर्निचरची पाहणी करुन सदर फर्निचर निर्लेखन करण्याची शिफारस केली आहे. त्यासंबधीचा समितीचा अहवाल सोबत जोडला आहे.

तरी वरीलप्रमाणे पदार्थविज्ञान विभागाकडील फर्निचर निर्लेखन करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(२)** | **पदार्थविज्ञान विभागाकडील लाकडी फर्निचर निर्लेखन करण्यासाठी गठीत केलेल्या समितीची शिफारस स्विकारण्यात येवून निर्लेखनास मान्यता देण्यात आली.** |

**विषय १८(३) दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांना द्यावयाच्या पदवी प्रमाणपत्राचे (Degree Certificate) आकारण्यात येणारे शुल्क रक्कम रु.१५०/- पर्यंत सुधरित करण्याबाबत.**

(टिपणी:- विद्यापीठ प्रचलित पध्दतीनुसार दीक्षांत समारंभासाठी विद्यार्थ्यांकडून PRESENTIA साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांकडून रु.७५/- असे शुल्क आकारले जाते आणि INABSENTIA साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांकडून रु.१००/- असे शुल्क आकारले जाते. तेव्हा PRESENTIA साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांकडून पोस्टाचा होणारा खर्च आकारला जात नाही. दीक्षांत समारंभदिवशी शिल्लक राहिलेले पदवी प्रमाणपत्र पोस्टाने पाठविण्याकरीता पोस्टाचा होणारा खर्च गृहीत धरुन PRESENTIA साठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांना सुध्दा रु.१००/- असे शुल्क आकारले जावे असे वाटते. तसेच पाचव्या दीक्षांत समारंभामध्ये विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्रासोबत स्मार्ट कार्ड देण्याचे योजिले आहे. सदरच्या स्मार्ट कार्डचे शुल्क रु.५०/- आकारण्यास मान्यता असावी. तरी एकूण शुल्क (Presentia, Absentia + Smart Card + Postage) रु.१५०/- ठेवणे योग्य होईल.

सदरचे एकत्रित शुल्क रु.१५०/- (Presentia, Absentia + Smart Card + Postage) स्वीकारण्यासाठी मा.व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता दिलेली आहे.

सबब, सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव ).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(३)** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय १८(४) मा. उच्च न्यायालयात सोलापूर विद्यापीठाच्या वतीने ॲड. श्री. खैरदी यांची केलेली नेमणूक व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर.**

(टिपणी: मा. उच्च न्यायालयात श्री. दफेदार जमील अहमद बख्तीयार यांनी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचेविरुध्द रिट पिटीशन दाखल केलेली आहे. सदरची रिट पिटीशन ही या पूर्वी आर्किड कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी यांनी दाखल केलेल्या रिट पिटीशनशी निगडीत आहे. म्हणून मा.कुलगुरु यांनी सदरची रिट पिटीशन चालविणेकामी ॲड. श्री. खैरदी यांची नियूक्ती केलेली आहे.
मा.कुलगुरु महोदय यांनी केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(४)** | **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.** |

**विषय १८(५) सन २००८-०९ सालातील टी. ए. बिल अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

१. क्रीडा विभागातर्फे **प्रा. लांडगे सुरेश महोदव** हे दि.१६/०९/२००८ ते १८/०९/२००८, दरम्यान संतोष भिमराव पाटील महाविद्यालय मंद्रुप येथे व्हॉली बॉल निवड समितीवर उपस्थित होते. त्यांचे टी. ए. बिल **रु.५९४/-**

२. **प्रा. लांडगे सुरेश महादेव** हे दि.१९/०९/२००८ ते २१/०९/२००८, दरम्यान कॉलेज ऑफ एज्युकेशन बार्शी येथे बास्केट बॉल निवड समितीवर उपस्थित होते. त्यांचे टी. ए. बिल **रु.२७०/-**

३. **प्रा. लकडे अतुल तानाजीराव** हे दि.२२/०९/२००८ ते २४/०९/२००८, दरम्यान कॉलेज ऑफ एज्युकेशन अक्कलकोट येथे फूटबॉल निवड समितीवर उपस्थित होते. त्यांचे टी. ए. बिल **रु.१८०/-**

४. **प्रा. माने आप्पासाहेब रामा** हे दि.२६/०९/२००८ ते २८/०९/२००८, दरम्यान लोकमंगल बायोटेक्नॉलॉजी कॉलेज वडाळा येथे खो-खो निवड समितीवर उपस्थित होते. त्यांचे टी. ए. बिल **रु.४४४/-**

५. **प्रा. पुदे नागनाथ नरसप्पा** हे दि.१४/१०/२००८ ते दि.१६/१०/२००८, दरम्यान संगमेश्वर कॉलेज, सोलापूर येथे चेस निवड समितीवर उपस्थित होते. त्यांचे टी. ए. बिल **रु.२७०/-**

उपरोक्तप्रमाणे सर्व निवड समिती सदस्याचे टी. ए. बिल अदा करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(५)** | **सन २००८-०९ सालातील क्रीडाविभागाचे अ. क्रं.१ ते ५ प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देयक आदा करण्यास मान्यता देण्यात आली.** |

**विषय १८(६) विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयातील एम. एड., एम. ए. एज्युकेशन, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, एम. ए. भूगोल, एम. ए. मास कम्युनिकेशन, पीएच.डी. इंजिनिअरींग बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी, बी. एस्सी. एन्ट्रेप्रेन्युअरशिप, बी. एस्सी. विधी महाविद्यालयातील (ग्रंथालय शुल्क) व वसतिगृह शुल्काबाबत शुल्क समितीने केलेल्या शिफारशी व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी.**

(टिपणी: विविध अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्यासाठी विद्यापरिषद व व्यवस्थापन परिषदेने प्राचार्य जे. के. बिले यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केलेली आहे.

गठीत केलेल्या समितीचा कार्यवृत्तांत व सुधारित शुल्क तक्ता सोबत जोडला आहे. प्रस्तावित शुल्क सन २००९-१० या शैक्षणिक वर्षापासून लागू करावयाचे असून सदर बाबत मा.कुलगुरु यांनी विद्यापरिषदेच्या वतीने सदरच्या शुल्कास मान्यता दिली असून महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम ५३ (ii) व ५४ (१) अन्वये सदरच्या शुल्काचा Ordinance तयार करुन त्यास मा.कुलपती तथा राज्यपाल यांची मंजूरी घेणे आवश्यक आहे. सदरचा Ordinance तयार करण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(६)** | **विद्यापीठातील व संलग्नित महाविद्यालयातील एम. एड., एम. ए. एज्युकेशन, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स, एम. ए. भूगोल, एम. ए. मास कम्युनिकेशन, पीएच.डी. इंजिनिअरींग बी.एस्सी. बायोटेक्नॉलॉजी, बी. एस्सी. एन्ट्रेप्रेन्युअरशिप, बी. एस्सी. विधी महाविद्यालयातील (ग्रंथालय शुल्क) व वसतिगृह शुल्काबाबत शुल्क समितीने केलेल्या शिफारशी स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.** |

**विषय १८(७) प्रा. डॉ. अनिल एन. बारबोले, व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे दि.०९/०९/०९ रोजीचे पत्र अवलोकनार्थ.**

टिपणी: सी. बी. खेडगीज् महाविद्यालय, अक्कलकोट येथील प्राचार्य पदाच्या मुलाखती दिनांक ०१/०८/२००९ रोजी पार पाडल्या. सदर मुलाखती दरम्यान सहभागी उमेदवार प्रा. डॉ. पिरगोंडे बी. आर. यांना निवड समिती सदस्यांनी योग्य वागणूक दिलेली नाही व विचारलेले प्रश्न अक्षेपार्ह तसेच पूर्वग्रह दूषित सूड बुध्दीने विचारल्याची तक्रार त्यांच्या पत्रासोबत जोडले आहे.

निवड समितीमध्ये मा.कुलगुरु यांचे प्रतिनिधींनी जबाबदारी योग्यपणे पार पाडण्यासाठी अचारसंहीता तयार करणे किंवा यापूर्वीची अचारसंहिता असल्यास त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी अशी विनंती डॉ. बारबोले यांनी त्यांच्या पत्रामध्ये केली आहे.

सबब सदरचे पत्र व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(७)** | **विद्यापीठ निवड समिती सदस्यांकरिता पुर्वीची आचारसंहिता विचारात घेवून अद्यावत आदर्श आचारसंहिता तयार करावी असे ठरले.** |

**विषय १८(८) श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी नेमणूकीसाठी प्राचार्यांना अधिकार देणेबाबत..**

टिपणीः प्राचार्य श्री. संत दामाजी महिवद्यालय, मंगळवेढा यांनी दिनांक ०९/०९/२००९ रोजी विद्यापीठ कार्यालयास पाठविलेले पत्र सोबत अवलोकनार्थ सादर.

सदरच्या पत्रामध्ये विद्या विकास मंडळ या संस्थेमध्ये दोन गटाच्या व्यवस्थापनामध्ये वाद उत्पन्न झाल्याने सदरचे प्रकरण सहा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे प्रलंबित आहे असे नमूद केलेले आहे. संबंधित महाविद्यालयातील रिक्त जागा भरण्याबाबत खास बाब म्हणून प्राचार्यांना अधिकार देण्यात यावेत अशी विनंती केलेली आहे.

सबब सदरचे पत्र व्यवस्थापन परिषदेसमोर विचारार्थ सादर).

| | |
|---|---|
| **ठराव क्र. १८(८)** | **प्राचार्य श्री. संत दामाजी महाविद्यालय, मंगळवेढा यांची विनंती विद्यापीठ कार्यकक्षेत येत नाही यास्तव अमान्य करण्यात आली.** |

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे मा.कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**प्राचार्य डॉ. आर. एन. शेंडगे**
**सचिव,**
**व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बी.पी. बंडगर**
**अध्यक्ष**
**व्यवस्थापन परिषद**